# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.

जुना एस.टी.स्टॅण्ड काप आळी, भिवंडी-४२१३०२, जि. ठाणे.

Phones : 02522 – 25314 / 255315 Fax: 02522 – 252074.

Email : bncmcwsd@gmail.com


जा.क्र.भिनिशमनपा/पा.पु.वि./३३ /२०२४ दिनांक ८/०९ /२०२४

प्रति,
श्री. मुनीसुव्रत रियलटर
एलएलपी द्वारा आर. आर. कंन्स.
भिवंडी. जि. ठाणे.

विषय :- पाणी पुरवठा, ड्रेनेज व मलनि:सारण व स्टॉर्म वॉटर ड्रेनजच्या व्यवस्थेबाबत ना हरकत दाखला मिळणेबाबत. मौजे – कामतघर येथील स.न. १२४/१२५/१५९ /१६१,१२५/५/१२५/७/१२/९, १२६/३/२,१६१/३/२,१६१/३/१/डी,या भुखंडावरील बांधकाम प्रस्तावाबाबत.

संदर्भ :- आपला दि. दि. १९/१०/२०२३ रोजीचा अर्ज

१. उपरोक्त संदर्भित पत्रानुसार विषयांकित जागेतील बांधकाम प्रस्तावाच्या अनुषंगाने पाणी पुरवठा, मलनि:सारण (ड्रेनेज) व स्टॉर्म बॉटर ड्रेनजच्या व्यवस्थेबाबत ना हरकत प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे.

२. त्या अनुषंगाने प्रस्तावित कार्यक्षेत्राची पहाणी केली असता मौजे – कामतघर येथील स.न. १२४/१२५/१५९/१६१,१२५/५/१२५/७/१२/९,१२६/३/२,१६१/३/२,१६१/३/१/डी, प्रस्तुत ठिकाणी एकूण २ इमारती बांधण्याचे प्रस्तावित असून या नमूद ठिकाणी १९२ सदनिका व तळ मजल्यावर महानगरपालिके करीता भाजी मार्केट बनविण्याचे प्रयोजन असल्याचे सादर केलेल्या आराखड्यामध्ये दिसून येत आहे.

३. विषयाधिन उपरोक्त प्रस्तावासाठी इमारत बांधून पूर्ण झाल्यानंतर अंदाजे १७५००० ते २००००० लि. प्रतिदिन इतक्या पाण्याची आवश्यकता भासणार असून सद्यस्थितीत भिवंडी मनपास मंजुर झालेली १०० द.ल.लि. प्रतिदिन पाणी पुरवठा योजना कार्यान्वित झाल्यानंतर विषयांकित जागेतील इमारतीस उपलब्ध होणा-या पाणी पुरवठयानुसार पाणी पुरवठा करण्यांत येईल,

४. विषयाधिन प्रस्तावासाठी मलनि:सारण व स्टॉर्म वॉटर ड्रेनेजच्या अनुषंगाने खालील नमुद अटी व शर्तीना अधिन राहुन नाहरकत दाखला देण्यात येत आहे.

१) मलप्रक्रिया केंद्र बांधणेपूर्वी त्याचे Design हे सल्लागाराकडून करून त्यासाठी आवश्यक असणारे Consent to २ Establish व बांधलेनंतर Consent to Operate प्रमाणपत्र महाराष्ट्र प्रदुषण मंडळाकडून (MPCB) घेणे बंधनकारक राहिल.

२) अर्जदार यांनी स्वखर्चाने आवश्यक त्या क्षमतेचा मलप्रक्रिया केंद्र (STP) बांधणे व त्याची कायम देखभाल, दुरुस्ती करणे बंधनकारक राहिल.

३) मलमिश्रित पाण्यावर प्रक्रिया करणे बाबत MPCB/CPCB यांचे निकषानुसार असलेले नियम लागू राहतील

४) मलप्रक्रिया केंद्रामुळे कोणतेही सार्वजनिक हितास बाधा येणार नाही तसेच सदरचे परिसरात

दुर्गंधी व अस्वच्छता होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

५) मलप्रक्रिया केंद्रामधुन प्रक्रिया केलेले सांडपाण्याचा पुर्नरवापर करणे बंधनकारक राहिल

६) आपण आपला भुखंड विकसित करीत असल्यामुळे भविष्यात शेजारील रहिवाशांना तसेच शेजारच्या भुखंडात सांडपाणी व पावसाळी पाणी साचणार नाही किंवा जाणार नाही याची सपूर्ण जबाबदारी आपल्यावर राहील.

७) रस्त्याच्या कडेला बांधण्यात येणा-या / बांधलेल्या गटारीच्या भिंतीवर आपणास कोणत्याही प्रकारे बांधकाम करता येणार नाही. अन्यथा तसे केल्यास तोडण्याचा महापालिकेला कायदेशिर अधिकार राहील.

८) सदर बांधकाम पुर्ण झाल्यानंतर नाल्यात/गटारात पडलेले बांधकामाचे साहित्य त्वरीत बाहेर काढुन टाकावेत

९) उर्वरीत इमारतींच्या जोत्याची उंची (Plinth Level) डी.सी. नियमाप्रमाणे (Devlopment Control Rule) उंच असणे आवश्यक आहे.

१०) सदर गटार/नाला/स्लॅबचे बांधकाम पुर्ण झाल्यावर महापलिकेला जागेसहित हस्तांतरीत करावयाचे आहे.

११) भविष्यात महानगरपालिकेने आपल्या नियोजित प्रकल्पाच्या शेजारी मलनिस्सारण वाहिनीचे काम पूर्ण केले असल्यास आपण महापालिकेची मंजूरी घेऊन जोडणी करणे बंधनकारक राहिल

१२) गटर/ नाला इत्यादी बांधण्यासाठी स्वतःच्या भूखंडाचा वापर करावा व आपल्या भूखंडातून गटार/नाला महानगरपालिकेच्या मुख्य नाल्यास जोडण्यात यावे.

१३) भविष्यात इतर भुखंडातुन पावसासाठी पाण्याचा / सांडपाण्याचा निचरा करण्याचे दृष्टिकोनातून गटार किंवा मलवाहिनी बांधावयाचे/ टाकावयाची झाल्यास आपणास किंवा आपल्या अशिलास तसेच सदनिकाधारकास कोणतीही हरकत घेता येणार नाही.

१४) पोडीयम वरील पावसाचे पाणी ठिकठिकाणी पुरेशे पाईपचे सहाय्याने स्टॉर्म वॉटर ड्रेनेजला जोडणे बंधनकारक राहील. त्यासाठी पोडीयम खाली स्टील्ट लेव्हल/ग्राउंड लेव्हलला स्टॉर्म वॉटर ड्रेनेज बांधुन नजीकच्या स्टॉर्म वॉटर ड्रेनेजला जोडणे बंधनकारक राहील. सदरचे काम स्टॉर्म वॉटर ड्रेनेज हे स्लॅबने बंदिस्त करणे ऐवजी लोखंडी जाळीने कव्हर करण्यात यावे,

१५) प्रस्तूत इमारतीचे बांधकाम प्रस्तावासाठी नियमानुसार रेनवॉटर हार्वेस्टिंगची व्यवस्था करणे बंधनकारक राहील.

१६) नियोजन प्राधिकरणाने दिलेल्या बांधकाम परवानगीमधील सर्व शर्ती/अटी अर्जदार यांना बंधनकारक राहतील

१७) शासनाचे पर्यावरण विभागाकडील संबंधित परिपत्रकाचे शासन नियमांचे सर्व शर्ती/अटी अर्जदार यांना बंधनकारक राहतील.

१८) सदर जागेबाबत कोणत्याही न्यायालयात/प्राधिकरणासमोर कोणत्याही प्रकारचा दावा/वाद चालू असल्यास त्याची जबाबदारी अर्जदार/जमीन मालक यांची राहिल.

वरील अटी व शर्तींच्या अधिन राहून या कार्यालयाकडुन बांधकाम परवानगी करीता पाणी पुरवठा व मलनि:सारण करीता दाखला देणेंत येत आहे.

(संदिप पटणावर)
कार्यकारी अभियंता (प्र.)
पाणी पुरवठा व मल नि:सारण विभाग.
भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.

प्रत माहितोस्तव सादर:

१.. मा. सहा. संचालक, नगररचना विभाग.

Letterhead Jay